कलाकारांनी मेहनत घेतली, पण मूळ दुर्गा झाला गौरीच्या प्रयोगाचा दर्जा मिळू शकला नाही. आम्ही प्रयोग विकेंद्रीकरणाचा प्रयोग म्हणून करुन पाहिला.

हा प्रयोग फसला तरी मी निराश नाही. नाटयपरिषदेकडे ती प्रस्ताव मांडतो की, त्या त्या वर्षाच्या उत्कृष्ट प्रोयोगिक नाटकाचे प्रयोग स्थानिक दिग्दर्शक व कलाकार यांच्याकडून करुन घ्यावेत आणि त्या त्या शाखेच्या परिघात याचे प्रयोग करावेत. म्हणजे त्या त्या शाखेत सृजनकार्य सुरु होईल. पुण्यातील यशस्वी प्रायोगिक नाटक तिथवर पोचणार नाही पण स्थानिक दिग्दर्शक व कलाकारांकरवी सादर होणारे प्रयोग तेथील प्रेक्षकांना पाहता येतील. परिषदेने तशी आर्थिक तरतूद करावी किंवा काही श्रीमंत शाखा आहेत त्यांच्याकडून त्यासाठी निधी जमवावा. परिषदेच्या उद्दीष्टामध्ये असा निधी जमवता येतो.

रंगभूमीवर सत्ता कुणाची ?

मध्यंतर या विषयाला तोंड फुटले होते. मला सत्ता हा शब्द खटकतो. सत्ता आली की राजकारण आले. एकमेकांवर कुरघोडी करणे आले, एकमेकांचे पाय ओढणे आले. सत्ता या शब्दा ऐवजी रंगभूमीवर महत्व कुणाला ? असे फारतर आपण म्हणू शकतो. मला असे वाटते की ही समहूकला आहे. प्रत्येक घटकाला यात तितकेच महत्व आहे. प्रत्येक घटकाचे कार्य काय आहे ? ते हवे तेवढेच होते आहे का ? संपूर्ण कला कृतीत ते बिघाड निर्माण करत नाहीना ? याचा विचार व्हावा.

कलाकृतीतील सर्व घटक जेव्हा एकजिनसी homogenious होतात तेव्हा ती कलाकृती उच्च दर्जा प्राप्त करते आणि एक सुविहित प्रयोग आपल्यासमोर सादर होतो.

संमेलनात यावर साधकबाधक चर्चा व्हावी हे अपेक्षित आहे.

**शासकिय अनुदाने :-**

आता महत्वाच्या विषयाकडे वळतो. महाराष्ट्र शासना तर्फे नाटयसंस्थाना निरनिराळ्या कारणांसाठी अनुदान दिले जाते.

संस्थांना अनुदान - रजिस्टर्ड नाटय संस्थाना किंवा सांस्कृतिक कार्य करणा-यांना असे अनुदान तीन वर्षांनी मंजूर होते. माझी सूचना आहे की महाराष्ट्रातील सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणा-या ज्या संस्थांनी अनुदानासाठी अर्ज केला असेल. अशा संस्थांचा गेल्या तीन वर्षाचा आर्थिक ताळेबंद व कार्याचे अहवाल पाहावे. ज्या संस्था सातत्याने कार्य करतात त्यांचा प्रथम विचार करावा आणि अशा संस्थांना एक वर्षा आड अनुदान मंजूर करावे. त्यामुळे अशा सातत्याने भरघोस कार्य करणा-या संस्थांचा आर्थिक भार कमी होईल व हे सातत्य टिकूल राहील.

प्रयोगांसाठी अनुदान - नांदेड येथील नाटयसंमेलनात अनुदान देण्याचा प्रस्ताव होता त्यावेळी मी प्रथम जाहिरपणे सांगितलं की, हे अनुदान प्रायोगिक नाटकांच्या प्रयोगांना मिळायला हवे. त्याची आवश्यकता प्रायोगिक नाटयसंस्थाना आहे. विजय केंकरे यांनीही व्यावसायिक नाटयप्रयोगांना अनुदानाची गरज नाही असा विचार मांडला.

आज आमचे म्हणणे मान्य झालं आहे आणि प्रायोगिक नाटयसंस्थांच्य प्रयोगाना अनुदान देण्याचा अध्यादेश निघाला आहे, पण त्यात ब-याच त्रुटी आहेत आणि तो बदलून घेणे आवश्य आहे. आज राष्ट्रीय पातळीवर दोन अंकी नाटकांपेक्षा सलग दीड ते पावणे दोन तासांची नाटके सादर होतात. हाच न्याय प्रायोगिक नाटकाला लावावा.

शासनाला नाटयव्यवसायाला आर्थिक हातभार लावायचा आहे. त्याबद्दल शासनाच्या सांस्कृतिक